# प्रादेशिक घडामोडी

Miss.Megha Satras

MPSC Rajyaseva 2024

(Dy. Director of Industries 2024)

## ➢ नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ:

- ठिकाण : Navi Mumbai

➢ मुख्य वैशिष्ट्ये:

- भारतातील सर्वात मोठा ग्रीनफिल्ड विमानतळ प्रकल्प
- सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) अंतर्गत विकसित
- मुंबई महानगर क्षेत्रासाठी दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ

➢ क्षमता व विस्तार:

- क्षेत्रफळ : ११६० हेक्टर
- वार्षिक प्रवासी क्षमता : ९ कोटी प्रवासी

➢ अद्वितीय वैशिष्ट्ये:

- स्वयंचलित प्रवासी वाहतूक व्यवस्था (पीपल मूव्हर)
- वॉटर टॅक्सीने जोडले जाणारे भारतातील पहिले विमानतळ

## ➢ देशातील पहिले स्मार्ट व बुद्धिमान गाव:

- ठिकाण : सातनवरी, ता.काटोल, जिल्हा: नागपूर
- येथे स्मार्ट शेती, दूरवैद्यकीय सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पाणी निरीक्षण व डिजिटल वर्ग यांसारखे उपक्रम राबवले जातात.

## ➢ भारतातील पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अंगणवाडी:

- नागपूर जिल्ह्यातील वडधामना येथे भारतातील पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अंगणवाडी सुरू करण्यात आली. हा उपक्रम मिशन बालभरारी अंतर्गत राबवला जात आहे.

## ➢ 'हिंदूभूषण' छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा:

- पुण्यातील मोशी येथे छत्रपती संभाजी महाराजांचा १८० फूट उंच 'हिंदूभूषण' पुतळा उभारण्यात आला आहे. हा छत्रपती संभाजी महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा असून त्याची नोंद लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे. शंभू सृष्टी प्रकल्पांतर्गत उभारणी करण्यात आली.

## ➢ नागपूरमध्ये कन्वेन्शन सेंटरची उभारणी :

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे सर्व आधुनिक सुविधांनी युक्त असे जागतिक दर्जाचे कन्वेन्शन सेंटर उभारण्याची योजना जाहीर केली आहे.

## ➢ मुंबई वन ॲपचे अनावरण:

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबई वन या ॲपचे अनावरण करतले आहे. हे मेट्रो, मोनोरेल, उपनगरीय रेल्वे आणि बस यांसारख्या 11 सार्वजनिक वाहतूक ऑपरेटरसाठी एकात्मिक सामायिक गतीशीलता ॲप आहे.

## ➢ हिप्परगा तलावाला जागतिक वारसा दर्जा:

- ठिकाण : सोलापूर
- आंतरराष्ट्रीय सिंचन व जलनिसर्ग आयोगाकडून हिप्परगा तलावाला जागतिक वारसा दर्जा प्रदान
- वैशिष्ट्ये: सुमारे १५४ वर्षे जुना तलाव सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारा महत्त्वाचा स्रोत
- विशेष बाब: महाराष्ट्रातील दुसरा जागतिक वारसा सिंचन प्रकल्प

## ➢ MILAAP पोर्टल:

- मिलाप पोर्टल हे MIDC चे भूखंड वाटप सुलभ करण्यासाठी सुरू केलेले डिजिटल व्यासपीठ आहे.
- MILAAP : एमआयडीसी इंडस्ट्रियल लँड ॲप्लिकेशन अँड अलॉटमेंट पोर्टल

## ➢ महाराष्ट्रातील पहिला काचेचा पूल :

- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील नापणे धबधब्यावर राज्यातील पहिला काचेचा पूल उभा करण्यात आला आहे. सिंधुरत्न योजनातून हा पूल उभारण्यात आला आहे. हा बारमाही वाहणारा धबधबा आहे.
- सिंधुदुर्ग देशातील पहिला पर्यटन जिल्हा
- वैभववाडी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रवेशद्वार

## ➤ महाराष्ट्र सरकारचे नवीन बांबू धोरण:

**केंद्रीय सरकारच्या नवीन बांबू धोरणानुसार सर्व सार्वजनिक आणि खाजगी औष्णिक वीज प्रकल्पांना कोळशासोबत 5-7% बांबू बायोमास वापरणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.**

**➤ या धोरणाचे मुख्य उद्देश :**

- **प्रदूषण कमी करणे, हरित ऊर्जेला प्रोत्साहन देणे, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे.**
- **यासाठी सरकारने चालू आर्थिक वर्षात बांबू आधारित उद्योगजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी रुपये 60 कोटीची तरतूद केली आहे.**

**➤ बांबू प्रक्रिया आणि उत्पादन समूह क्लस्टर्स: गडचिरोली, नागपूर, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड, नाशिक, पुणे, कोल्हापूर,रत्नागिरी, सिंधुदुर्ग**

UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

## ➢ महाराष्ट्राचा नवीन विश्वविक्रम – सौर कृषी पंप

- महाराष्ट्राने एका महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप बसवून नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला.
- या कामगिरीची नोंद Guinness World Records मध्ये झाली

➢ योजना: मागेल त्याला सौर कृषी पंप योजना

- सुरुवात :२५ जुलै २०२४
- अंमलबजावणी : महावितरण

➢ उद्दिष्ट:

- पुढील ५ वर्षांत १० लाख सौर कृषी पंप देणे
- ज्या शेतकऱ्यांकडे जलस्रोत आहेत पण वीज जोडणी नाही त्यांना ऑफ-ग्रिड सौर पंप देणे

## ➢ महाराष्ट्राने कुष्ठरोगाला अधिसूचित रोग घोषित केले :

- ➢ महाराष्ट्र सरकारने कुष्ठरोग हा अधिसूचित रोग (notifiable disease) म्हणून घोषित केला.
- ➢ उद्देश: रोगाचा प्रसार रोखणे,रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध करून देणे,आरोग्य यंत्रणेद्वारे नियंत्रण व नोंदणी सुलभ करणे
- ➢ रोगाविषयी माहिती:
- कारणीभूत जीवाणू :Mycobacterium leprae
- परिणाम होणारे अवयव : त्वचा,परिघीय मज्जातंतू,डोळे
- राज्याचे उद्दिष्ट: २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र करणे

## ➢ महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण २०२५:

- घोषणावाक्य: “माझे घर, माझा हक्क”
- पार्श्वभूमी: २०१५ व २०२१ मध्ये मसुदा तयार झाला होता मात्र तो अधिकृतपणे प्रकाशित झाला नव्हता
- उद्देश: परवडणारे, शाश्वत व पर्यावरणपूरक गृहनिर्माण,हवामान बदलास संवेदनक्षम (रेजिलियंट) घरे निर्माण करणे

➢ उद्दिष्टे:

- २०३० पर्यंत ३५ लाख घरे
- २०२५ पर्यंत ५० लाख घरे

➢ आर्थिक तरतूद: महाआवास निधी – ₹२०,००० कोटी

➢ धोरणाची चार मुख्य तत्त्वे:

- परवडणारे (Affordable)
- समावेशक (Inclusive)
- शाश्वत (Sustainable)
- संवेदनक्षम (Resilient)

- **महत्त्वाच्या शिफारसी:**
- **अडचणीत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांसाठी राज्य पुनर्विकास निधी स्थापन करणे**
- **लँड बँक उपक्रम:३१ मार्च २०२६ पर्यंत राज्यभर जमीन बँक डेटाबेस तयार करणे**
- **जिल्हानिहाय बांधकामयोग्य जमिनीचा डेटा तयार करणे**
- **महाराष्ट्राला झोपडपट्टीमुक्त राज्य बनवणे.**

## ‘मिसिंग लिंक’ प्रकल्प : मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग

- **स्थान: खोपोली एक्झिट ते कुसगाव दरम्यान**
- **प्रकल्पाची वैशिष्ट्ये:**
- **एकूण बोगदे – 2**
- **८.९ किमी (देशातील सर्वात लांब बोगदा)**
- **१.७ किमी(आशियातील सर्वात रुंद बोगदा : २३.३० मीटर)**

- ➢ **महाराष्ट्र रेडिओ महोत्सव २०२५:**
- दिनांक : २१ जून २०२५ (जागतिक संगीत दिन)
- ठिकाण : Mumbai
- आयोजन : सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र
- देशातील पहिला सृजनशील व सांस्कृतिक रेडिओ महोत्सव
- ➢ याच वेळी महाराष्ट्र आशा रेडिओ गौरव पुरस्कार २०२५ प्रदान:
- आसा रेडिओ जीवनगौरव पुरस्कार : विश्वनाथ ओक
- सर्वोत्कृष्ट रेडिओ केंद्र : रेडियो सिटी
- सर्वोत्कृष्ट कम्युनिटी रेडिओ केंद्र : विकास भारती रेडिओ केंद्र, नंदुरबार

UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

## ➢ अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती:

**अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त भोपाळ मध्ये महिला सशक्तीकरण महासंमेलन आयोजित केले गेले.**

## ➢ अहिल्यादेवी होळकर :

- **परिचयजन्म : चोंडी (अहिल्यानगर)**
- **उपाधी : लोकमाता**
- **निधन : महेश्वर (मध्य प्रदेश)**
- **त्या धनगर समाजातील सामान्य कुटुंबातून आल्या.**
- **१७३३ : मल्हारराव होळकर यांच्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी विवाह**
- **१७६७ : इंदोरच्या शासक बनल्या**
- **१७६७ ते १७९५ : प्रभावी राज्यकारभार**
- **१७६९–७० : दुष्काळाच्या काळात व्यवस्थापन**
- **१७७१–७३: दरम्यान सोमनाथ मंदिराचे पुनर्निर्माण**

## ➢ पशुसंवर्धनाला कृषी समकक्ष दर्जा - महाराष्ट्र:

महाराष्ट्राने पशुधन व कुक्कुटपालनाला कृषी समकक्ष दर्जा देणारे **भारतातील पहिले राज्य** ठरले आहे. यामुळे पशुपालन क्षेत्राला प्रोत्साहन मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. राज्याचा **सकल उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा 12%** असून त्यातही **पशुजन्य उत्पन्नाचा वाटा 24%** आहे.

## ➢ गणेशोत्सव राज्य उत्सव म्हणून घोषित:

महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे. लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश काळात लोकांना एकत्र आणण्यासाठी या उत्सवाची सुरुवात केली होती

## ➢ मुंबई येथे EduCity उभारणार :

आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब नवी मुंबईत उभारण्यात येणार असून महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणाअंतर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केले आहे.

## ➢ महाराष्ट्र आणि स्टारलिंकमध्ये करार :

- स्टारलिंक सॅटलाइट कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेडसोबत करार करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे.
- या कराराअंतर्गत राज्यातील शासकीय संस्था आणि ग्रामीण भागात उपग्रह आधारित इंटरनेट सेवा पुरवली जाणार आहे.
- हा उपक्रम राज्याच्या डिजिटल महाराष्ट्र मिशनचा एक भाग असून मर्यादित नेटवर्क ॲक्सेस असलेल्या भागात डिजिटल कनेक्टिव्हिटी मजबूत करण्याचा मुख्य उद्देश आहे.

## ➢ रेडिओ परवाज केंद्र:

**महिला कैद्यामध्ये जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहात रेडिओ प्रवास या अंतर्गत कम्युनिटी रेडिओ केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.निवृत्त आयपीएस अधिकारी आणि पुदुचेरीच्या माजी नायब राज्यपाल किरण बेदी यांच्या हस्ते या रेडिओ केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.**